**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण**

**एक्सप्रेस टॉवर्स, ४ था मजला, नरिमन पॉईंट, मुंबई-२१**

जा.क्र.मजीप्रा/ससःतांशा-१/३५० / ४६३ दिनांक - १७ / ३ /२००८

**परिपत्रक क्र. १२४**

**विषय** - पाणी पुरवठा तसेच मलनिःसारण योजनांच्या व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकास कामांच्या अंदाजपत्रकांना तांत्रिक मंजूरीच्या अधिकाराबाबत. **अधिकारात वाढ करण्याबाबत.**

**संदर्भ** - १. मध्यवर्ती कार्यालयाचे दि. २८.४.०५ चे पत्र क्र.मजीप्रा/सस/तांशा-१/३५०/५७०.

२. शासन परिपत्रक क्र.ग्रापापु.१००५/प्रक्र.८५/पापु.०७ दि.९.५.२००५

राज्यातील नागरी पाणी पुरवठा व मलनिःसारण व ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या तसेच विविध स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकास कामांना म.जी.प्रा. मार्फत विविध स्तरावर तांत्रिक मान्यता देण्यात येते. सदर तांत्रिक मान्यतेचे विविध स्तरावरील सुधारित आदेश उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये निर्गमित करण्यात आले आहेत. तसेच जिल्हा परिषदेकडील राज्य शासन पुरस्कृत महाजल व केंद्र शासन पुरस्कृत स्वजलधारा योजनांसाठी तांत्रिक मंजूरीचे अधिकार संदर्भ क्र.२ अन्वये प्रदान केले आहेत.

तथापि, दरम्यानच्या काळात चलन फुगवटा, रुपयाचे अवमूल्यन, त्याचप्रमाणे भाववाढ या याबाबीमुळे कामाच्या किमतीमधे बऱ्याच प्रमाणात वाढ होत आहे. त्याचप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकास कामातही दिवसें-दिवस सुधारणा / वाढ होत असल्याने (जसे सिमेंट कॉंक्रिट रोड इ.) त्यांच्या कामांना तांत्रिक मान्यता देण्याचे प्रस्ताव म.जी.प्रा. कडे मंजूरीसाठी येत आहेत. या सर्व बार्बीचा विचार करण्यात येऊन, उपरोक्त संदर्भिय दोनही पत्रे तसेच परिपत्रकान्वये निर्गमित केलेले म.जी.प्रा.चे कार्यकारी अभियंता व अधीक्षक अभियंता त्याचप्रमाणे जिल्हा परिषदेकडील कार्यकारी अभियंता यांच्या प्रचलित तांत्रिक मंजूरीचे अधिकार रद्द करण्यात येत असून सुधारित अधिकार खालीलप्रमाणे राहतील.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे पदनाम | पूर्वीचे अधिकार | | प्रस्तावित मंजूरीचे अधिकार. | |
|---|---|---|---|---|---|
| | | जिल्हा परिषद | म.जी.प्राधिकरण | जिल्हा परिषद | म.जी.प्राधिकरण |
| १. | कार्यकारी अभियंता | रु. ७५.०० लक्ष पर्यंत. | रु. २५.०० लक्ष पर्यंत. | रु. ७५.०० लक्ष पर्यंत. | रु. ७५.०० लक्ष पर्यंत. |
| २. | अधीक्षक अभियंता | - | रु. ६०.०० लक्ष पर्यंत. | रु. ७५.०० लक्ष | रु. ७५ ते २५०.०० लक्ष पर्यंत. |
| ३. | मुख्य अभियंता | - | पूर्ण अधिकार. | - | पूर्ण अधिकार. |

येथे नमूद करण्यात येते की, उपरोक्त तक्त्यामध्ये जि.प.कडील कार्यकारी अभियंता यांना प्रचलित व प्रस्तावित मंजूरीचे अधिकारात काही बदल झाला नसल्याचे दिसून येत असले

तरी, सदरचे अधिकार हे केवळ राज्य शासन पुरस्कृत महाजल व केंद्र शासन पुरस्कृत स्वजलधारा योजनांसाठीच होते. तथापि आता सदरचे अधिकार हे या योजनांबरोबरच जिल्हा परिषदेकडील इतरही योजनांना लागू करण्यात येत आहेत.

वरील सूचना या परिपत्रकाच्या दिनांकापासून लागू राहतील.

सही/-
**( संजय दहासहस्त्र )**
**सदस्य सचिव**

प्रत-

प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ नागपूर
अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ ( सर्व)
कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम विभाग/ प्रकल्प विभाग (सर्व)
कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, (सर्व)